# आर्ट, कलर, केमिस्ट्रीची सायन्स टॉकमध्ये चर्चा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

**रविवारी आयोजन; नावनोंदणीचे आवाहन**



विज्ञानाबाबत मुलांमध्ये गोडी निर्माण व्हावी, त्यात संशोधन करण्याची इच्छा निर्माण व्हावी या हेतूने नॅशनल केमिकल लॅबोरेटरी आणि व्हेंचर सेंटर यांच्यातर्फे राबविल्या जाणाऱ्या सायन्स टॉक या उपक्रमांतर्गत 'आर्ट कलर अँड केमिस्ट्री' या विषयावरील टॉकचे आयोजन करण्यात आले आहे.

येत्या रविवारी (३१ मे) ट्रेनिंग रूम, व्हेंचर सेंटर, एनसीएल, पाषाण येथे सकाळी दहा ते सव्वाअकरा या वेळेत हा सायन्स टॉक होणार आहे. एनसीएल येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. साक्य सेन या विषयावर संवाद साधणार आहेत. इयत्ता चौथी ते दहावी या वयोगटातील (वय वर्षे दहा वर्षे आणि त्यापुढील) मुलांना तसेच विज्ञानप्रेमींना या टॉकमध्ये सहभागी होता येणार आहे. या टॉकमध्ये सहभागी होण्याची इच्छा असणाऱ्यांनी नावनोंदणी करावी, असे आवाहन एनसीएलतर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी नावनोंदणीची व्यवस्थाही आहे.

गेले सहा वर्षे हा उपक्रम राबविला जात आहे. यापूर्वी 'केमिस्ट्री ऑफ फूड', 'ओरिजिन अँड इव्हॉल्यूशन ऑफ अर्थ', 'हायड्रोजन एनर्जी अँड फ्युएल सेल' या विषयावर सायन्स टॉक झाले आहेत.

- ३१ मे रोजी ट्रेनिंग रूम, व्हेंचर सेंटर, एनसीएल, पाषाण येथे आयोजन.
- इयत्ता चौथी ते दहावी या वयोगटातील (वय वर्षे दहा वर्षे आणि त्यापुढील) मुलांना तसेच विज्ञानप्रेमींना या सायन्स टॉकमध्ये सहभागी होता येईल.
- नावनोंदणीसाठी वेबसाइट : register@excitingscience.org